# दप्तराशिवाय शाळा

'स्पिक अ‍ॅण्ड स्पॅन कॉन्व्हेंट' या शाळेला चौदा वर्षे पूर्ण झालीत. आजवर राबवलेल्या विविध उपक्रमांवर आधारीत शाळेची काही ठळक वैशिष्टये:-

- ❖ नर्सरी ते १० वी वर्ग
- ❖ विद्यार्थी शाळेत दप्तर आणणार नाहीत.
- ❖ शाळेत इंग्रजी बोलणे अनिवार्य.
- ❖ इंग्रजी व्याकरण, शब्दसंपत्ती, 'आनापान' या ध्यानपद्धतीचा अवलंब.
- ❖ संपूर्ण अभ्यास पाठांतरासह शाळेतच होणार असल्यामुळे शिकवणीची गरज नाही.
- ❖ सर्वच विद्यार्थ्यांच्या मार्कांमध्ये प्रचंड वाढ.
- ❖ कराटे, नृत्य व संगणकीय ज्ञान यांचे प्रशिक्षण.

उपरोक्त वैशिष्ठे नमूद केलेली जाहिरात जेव्हा दिली, तेव्हा विचारणा होऊ लागली की, तुम्ही दप्तर शाळेतच ठेऊन घेणार का? आम्ही उत्तर दिलं 'नाही'. आम्हाला हवीत फक्त पाठ्यपुस्तके व सुटे कागद. आता प्रत्येक विषयासाठी वेगळी वही व व्यवसायमाला यांची अजिबात आवश्यता नाही. मग सर्वांचा प्रश्न! शिकवणार कसे? त्याला दिलेले हे विस्तृत उत्तर.

'स्पिक अ‍ॅण्ड स्पॅन' जेव्हा सुरु केली, तेव्हा इंग्रजीचा पाया मजबूत करण्यासाठी शाळेने भरपूर परिश्रम घेतले. नर्सरी, केजी-I, केजी-II, च्या विद्यार्थ्यांकडून ५०० वाक्यें व ५०० शब्द करवून घेतले आणि म्हणूनच पहिल्या वर्गापासून शाळेत इंग्रजी बोलणे अनिवार्य करता आले. विद्यार्थ्यांना इंग्रजी संभाषणात तयार करण्याची सर्व जबाबदारी शाळेने स्विकारली.

'स्पिक अ‍ॅण्ड स्पॅन' जेव्हा सुरु केली, त्याच वेळी मी 'विपश्यना ध्यान शिकले. या ध्यानाचे फायदे जसजसे माझ्या लक्षात आले तशी ध्यानाची ही पद्धत मी शाळेत सुरु केली. सुरवातीला रोज १५ मिनिटे सर्व विद्यार्थी व शिक्षिका ध्यान करतात, तेव्हा जाणवते ती अलौकिक शांतता आणि विचारांचा गोंधळ

शांत झाल्यावर ‘स्पिक ॲण्ड स्पॅन’ च्या अभ्यासाला सुरवात होते आणि नि:संशय त्यांच्या अभ्यासात गुणात्मक फरक जाणवतो. कारण **ध्यानी तो ज्ञानी.** हे ध्यानच तर विद्यार्थ्याला रोजच्या ताण-तणावापासून दूर ठेवतं व एकाग्रता साधण्यास मदत करतं. मागील वर्षापर्यंत ‘स्पिक ॲण्ड स्पॅन’ मध्ये शिक्षिका प्रथम सर्व विद्यार्थ्यांना धडा समजावून सांगत असत व त्यावरील प्रश्नोत्तरे फळयावर लिहून देत असत. मोठ्या वर्गातील विद्यार्थ्यांस उत्तरे तोंडी सांगितली जात. मुलांनी वहीत लिहिल्यावर शिक्षिका त्या वह्या तपासून देत असत. विद्यार्थी घरी आईबरोबर किंवा शिकवणी - वर्गाच्या शिक्षिकेबरोबर ती उत्तरे पाठ करत. त्यानंतर दुसरा धडा शिकवला जात असे. त्यानंतर एकदम दीड ते दोन महिन्यानंतर घटक चाचणीमध्ये विद्यार्थ्यांचे मूल्यांकन केले जात असे. ही प्रक्रिया विद्यार्थ्यांची विचार करण्याची शक्तीच खुंटवून टाकते.

## या पद्धतीतील त्रुटी :

१) एकदम दोन महिन्यानंतर जर शिक्षिकेला विद्यार्थ्यांमध्ये अपेक्षित प्रगती दिसली नाही, तर मागे जाऊन पुन्हा पहिला धडा समजावण्यास ती वेळेअभावी असमर्थ असते.

२) घटक-चाचणी परिक्षेत ५०% विद्यार्थ्यांची प्रगती असमाधानकारक दिसते यावर शिक्षिका निष्कर्ष काढतात, की मुले घरी अभ्यास करत नाहीत व पालक निष्कर्ष काढतात की, मुलांना धडा समजलेला नाही.

यावर तोडगा म्हणून ते मुलांना शिकवणी वर्गास पाठवतात. या मागील कारणे शोधतांना असे लक्षात येते की, जेव्हा आपण धडा प्रथम वाचतो, त्यातील मजकुर आपल्याला २५% च आकलन होतो. संपूर्ण आकलनासाठी तो धडा आपल्याला पुन्हा-पुन्हा वाचावा लागतो. पाठ नेटाने तीन-चारदा वाचल्यास त्यातील गर्भित / खोल दडलेला अर्थ आपण समजावून घेऊ शकू. आज काय झालंय! मुले (विद्यार्थी) धडे वाचतच नाहीत. एकदम प्रश्नोत्तरे पाठ करायला जातात. त्या प्रश्नांमध्ये पूर्ण धडा बहुदा येतच नाही, तेव्हा विद्यार्थ्यांना त्या धड्याविषयी काहीतरी अर्धवटच माहिती मिळते. जेव्हा शिक्षक धडा समजावून

देतात, तेव्हा किती विद्यार्थी लक्ष देऊन ऐकतात? बरेच विद्यार्थी फक्त शरिरानेच वर्गात असतात. त्यांच मन मात्र इतरत्र भटकत असतं. अशा विद्यार्थ्यांना कितीही समजावले तरीही धडा समजतच नाही. या विद्यार्थ्यांसाठी हा सगळा वेळ वायाच गेला.काही खोडकर विद्यार्थी वर्गात येतात ते फक्त मस्ती करण्यासाठी. सतत दुसऱ्याची खोडी काढणे / बोलणे यातच वेळ घालवतात. त्यांना कितीही समजवा, त्यांना समजणारच नाही. काही विद्यार्थी ऐकण्याचा प्रयत्न करतात. पण धडा शिकवणे म्हणजे सोपी गोष्ट नव्हे. यासाठी कितीतरी शैक्षणिक साधनांचा उपयोग करावा लागतो. संदर्भग्रंथ वाचावे लागतात. भाषा विषयासाठी नाट्यरुपांतराचा उपयोग करावा लागतो. संदर्भग्रंथ वाचावे लागतात. भाषा विषयासाठी नाट्यरुपांतर करवून घेणे, निबंध लिहायला सांगणे, सायन्सच्या प्रयोगांसाठी नेहरु सायन्स सेंटर, रमण सायन्स सेंटर', यासारख्या ठिकाणी नेऊन प्रयोग दाखविणे त्या अनुषंगाने ऐतिहासिक व भौगोलिक स्थळांना भेटी देणे, त्यावर निरनिराळे प्रोजेक्टस् तयार करणे, त्या प्रोजेक्टस्चे सादरीकरण करणे, विद्यार्थ्यांची चर्चासत्रे घडवून आणणे असे कितीतरी उपक्रम राबवावे लागतील.

एखादं बी जेव्हा तुम्ही पेरता त्या बीमधुन अंकुर फुटेल, त्या अंकुराचं रोपात परिवर्तन होईल तेव्हा शेतकरी/तुम्ही काय करु शकता? तुम्ही पाणी घालता, थोडीशी जमीन उकरुन सैल करता, खत देता, सावलीची व्यवस्था करता. (छोटं असतांना कडक उन्हापासून संरक्षण करण्यासाठी) पण त्या रोपटयाला वाढावं लागतं स्वत:च त्यासाठी तुम्ही काहीही करु शकत नाही. तसचं शिक्षणाचं आहे. त्या विद्यार्थ्याला पोषक वातावरण देणं हेच शिक्षकांच कर्तव्य आहे.

जेव्हा मी शाळा सुरु केली तेव्हा केवळ मार्कस् कमी मिळतात म्हणून पालक/ शिक्षक/ समाज विद्यार्थ्यांची हेटाळणी करतात, ती मी ऐकली होती तेव्हा माझ्या मनात विचार आला, इतकं का कठीण आहे मार्कस् मिळवणं? मी नेहमीच म्हणत असे की अगदी गाळातला गाळ आला तरी, ढ तला ढ विद्यार्थी आला तरी मी त्याला तयार करीनच.

दुसरा प्रश्न असा, विद्यार्थी शाळेत ५ ते ६ तास असतो, जो विद्यार्थी ६ तास

रोज अभ्यास करतो, तो नापास का होतो? (शाळेत विद्यार्थी ६ तास अभ्यासच करत असतो.) त्याला अजून घरी अभ्यास करण्याची गरज का भासावी?

जेव्हा, जेव्हा मी पालकांशी संवाद साधला, तेव्हा म्हटलंय की नका हो मुलांना शिकवणी लावू. त्यांना आपल्या मनाने, एकटयानेच अभ्यास करु द्या. पण पालकांची अगतिकता समजावून घ्यायला हवी. जेव्हा सर्व मुलं शिकवणी लावतात व आपणच लावली नाही तर त्या पालकांना समाजातले/घरचे/नातेवाईक विचारतात, ट्युशन नाही लावली? नुकसान करायचं आहे का त्या मुलाचं?'

## स्वयं अध्ययन पद्धती :

सध्या 'स्पिक ॲण्ड स्पॅन' मध्ये याच पद्धतीचा अवलंब करण्यात येतो. एखाद्या विषयाचा पहिला धडा शिकवणे सुरु केले तर विद्यार्थ्यांना सांगण्यात येते की पहिला परिच्छेद तुम्ही लक्षपूर्वक वाचा. नंतर त्या परिच्छेदावरील प्रश्न विद्यार्थ्यांना विचारण्यात येतात. असे लक्षात आले की विद्यार्थी वेगवेगळया प्रश्नांना, अपेक्षित असलेली उत्तरे सहजपणे देतात. याचाच अर्थ विद्यार्थ्यांना त्या परिच्छेदाचे आकलन पूर्णपणे झालेले आहे. विद्यार्थी या ३-४ प्रश्नांची उत्तरे वाचतात, पाठ करतात व प्रत्येक विद्यार्थी ही उत्तरे शिक्षिकेला म्हणून दाखवितात. जर एखाद्याला उत्तर सांगणं जमलं नाही तर त्याच्याकडून इतर विद्यार्थी ते उत्तर पाठ करुन घेतात व मग तो शिक्षिकेला म्हणून दाखवतो व नंतर शिक्षिका पुढील परिच्छेदाकडे वळते. या प्रकारे एक दिवसात ८-१० प्रश्न तयार झालेत की दुपारी ४ ते ५ या वेळात विद्यार्थ्यांची वर्गपरीक्षा (Class Test) होते शिक्षिका स्पेलिंग सुद्धा विद्यार्थ्यांकडून तोंडी म्हणवून घेतात. अशा पद्धतीने ३-४ परिक्षा घेतल्या जातात. या पद्धतीने विद्यार्थ्यांना प्रश्नांची उत्तरे पाठ झालीत की नाही हे लगेचच समजतं. अशाप्रकारे दुसरा धडा जेव्हा सुरु केला जातो, तेव्हा पहिल्या पाठावरील १-२ प्रश्न प्रत्येक Test मध्ये टाकले जातात व नवीन धडा पूर्ण झाला की दोन्ही पाठांवर आधारित टेस्ट घेतली जाते.

या स्वयं-अध्ययन पद्धतीत अध्ययन करणे हे अपरिहार्य झाल्यामुळे

विद्यार्थी सदैव अध्ययन करण्यात गुंतलेले दिसतात.

## या पद्धतीचे पुढील फायदे आपल्या निदर्शनास येतील.

१) विद्यार्थ्यासमोर प्रश्नाचे उत्तर पाठ्यपुस्तकामध्येच अधोरेखित केल्यामुळे स्वच्छ, चुकांविरहित असे 'लिखित' त्यांच्यासमोर असेल तर अर्थाचे आकलन चटकन होते व आकलनामुळे पाठाचे अध्ययन लवकर होते. आधीच्या पद्धतीत शिक्षिका प्रश्नोत्तरे तोंडी सांगत. त्यात विद्यार्थी घाई झाल्यामुळे घाणेरड्या हस्ताक्षरात, बरंचसं चूक, त्यातही अनेक शब्द खाल्लेले! गाळलेले असे लिहित आणि नाइलाजास्तव शिक्षिकेला त्या वह्या तशाच तपासाव्या लागत व त्यात बऱ्याचशा चुका राहण्याचीही शक्यता असे आणि असं घाणेरडं लिखित समोर ठेवल्यामुळे विद्यार्थ्यांला उत्तराचा अर्थच नीट लागत नसे. त्यात विद्यार्थ्याचा दोष नव्हताच. जर पाठच होत नाही तर परिक्षेत तो लिहिणार काय? व त्याला मार्क्स मिळणार किती? पण आता पाठ्यपुस्तकांमध्येच उत्तरे रेखांकित केल्यामुळे, घाणेरडे अक्षर व असंख्य चुकांच्या समस्या दूर झाल्या व अर्थ समजायला लागला व पाठांतर भराभर होऊ लागले. विद्यार्थ्यांमधे शिक्षिकेला पाठ म्हणून दाखवण्याची चढाओढ सुरु झाली. 'Teacher....I, Teacher....I' असा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळू लागला. Teacher पाठ घेणार म्हणजे मला एका दमात, न अडखळता उत्तर देता यावं म्हणून विद्यार्थी पुन्हा-पुन्हा ते उत्तर धड्यातून वाचू लागले आणि Teacher ला सांगण्याआधी एकमेकांना पाठ म्हणून दाखवू लागले. सतत वाचनाने पाठांतर सोपे झाले व संध्याकाळी उत्साहाने 'test' देण्यात येऊ लागल्या. सुरवातीच्या एक-दोन test मध्ये कमी गुण मिळाले, तरी नंतरच्या गुणांमध्ये प्रचंड वाढ दिसली आणि विद्यार्थी एकदम अभ्यासू झाले.

जे विद्यार्थी उगीचच अनुपस्थित राहात होते, त्यांच्या उपस्थितीत वाढ झाली. कारण वाचणं, पाठ करणं, सांगणं, test मधे चांगले गुण मिळवणं हा एक आनंदमय अनुभव होऊन गेला. काही काही प्रश्नांची उत्तरे मात्र पाठ्यपुस्तकाप्रमाणे जशीच्या तशी ठेवता येत नाहीत. क्रमवार आणि मुद्देसूद उत्तर तयार करावं लागतं. त्यामुळे एक विद्यार्थी एक-एक मुद्दा फळ्यावर लिहितो

व इतर विद्यार्थी त्याला मदत करतात. उत्तर फळ्यावर तयार झालं की, विद्यार्थ्यांना दहा मिनिटे पाठांतरासाठी दिली जातात, ते उत्तर विद्यार्थी एकमेकांना सांगतात, व नंतर शिक्षिकेला सांगतात. अशी ४-५ प्रश्नोत्तरे तयार झाली की त्यावर त्या दिवशी परीक्षा घेण्यात येते. असे लक्षात आले आहे की, ज्या पद्धतीने उत्तर तयार झाले होते, त्यापेक्षा अधिक चांगल्या तऱ्हेने जास्त संक्षिप्त, योग्य व नेमकं उत्तर लिहिलं जातं. हे सगळं आकलनाशिवाय नक्कीच झालं नाही!

या पद्धतीने एखादी आकृती पुस्तकात दिली नसली तरी मुले धड्यातील माहितीच्या आधारे आकृती काढतात. प्रश्नाप्रमाणे उत्तर कसं बदलते, याचे कसब शिक्षिका विद्यार्थ्यांना अवगत करते. जसे-कारणे द्या. तुलना व फरक, संदर्भासहित अर्थ इत्यादी. कधी कधी तर शिक्षिका एखाद्या उत्तरासाठी किती निरनिराळे प्रश्न होऊ शकतील ह्याची स्पर्धाच आयोजित करते. या पद्धतीने विद्यार्थी प्रश्नोत्तरे स्वत:च तयार करण्यात निष्णात होतात. संपूर्ण धडा विद्यार्थ्यांना समजला की नाही याचे मूल्यमापन करण्यासाठी शिक्षिका वस्तुनिष्ठ चाचणी घेते. त्यात जोड्या लावा, चूक की बरोबर, रिकाम्या जागा भरा इत्यादी प्रश्नांचा समावेश असतो.

ज्या मुलांनी प्रत्येक विषयांच्या इतक्या वस्तुनिष्ठ व वर्णनात्मक परीक्षा दिल्या, त्यांच्या आकलनाचा थोडा सुद्धा संशय तुम्हाला येणार नाही. साधारण प्रत्येक विद्यार्थ्याला अवघड वाटणारे असे दोनच विषय १) गणित, २) इंग्रजी.

'स्पिक ॲण्ड स्पॅन' ची सुरवातच मुळी इंग्रजीचा मजबूत पाया या तत्वावर सुरु झाल्यामुळे इंग्रजीची भीती 'स्पिक ॲण्ड स्पॅन' च्या विद्यार्थ्यांच्या मनात कधीच नव्हती. म्हणून स्वयं-अध्ययनाची पद्धत यशस्वी ठरली.

आता राहिलं गणित. गणिताचं पुस्तक उघडलं की असं दिसतं की प्रत्येक पाठाच्या आधी थोडी माहिती दिलेली असते व ४-५ उदाहरणे सोडवून दाखवलेली असतात.

स्वयं-अध्ययन पद्धतीमध्ये आम्ही विद्यार्थ्यांना सांगतो की, ही माहिती वाचा व दाखवलेल्या उदाहरणाप्रमाणे प्रश्नसंग्रहामधील उदाहरणे फळ्यावर

सोडवा. प्रत्येक वर्गामध्ये २-३ विद्यार्थी चटकन् पुढाकार घेतात व फळ्यावर गणित सोडवून दाखवतात. त्यावेळी इतर विद्यार्थी निरिक्षण करीत असतात. त्यांना ती गणितं आकलन होतात व या प्रकारे प्रत्येक विद्यार्थी गणित फळ्यावर स्वत: सोडवतो. शिक्षिका फक्त मागे खुर्चीवर बसलेली असते. दिवसभरात वर्गात सोडवलेली गणितं मुलांना रोज ४ प्रश्नसंग्रह याप्रमाणे गृहपाठ म्हणून दिली जातात. हा गृहपाठ पुस्तकात न बघता मनानेच करावा, यासाठी पालकांनी जागरुक राहायचे आहे.

वरील प्रकारे स्वयं-अध्ययनाच्या पद्धतीमुळे विद्यार्थी त्यांच्याबरोबर फक्त डबा, वॉटर बॅग, कंपास व गृहपाठाचे कागद आणतात. पाठ्यपुस्तक, फाईल्स व कोरे कागद शाळेतच ठेवून घेण्यात येतात.

शिक्षिकेने फळ्यावर भरकन् गणित समजावून सांगणं फार सोपं आहे, पण विद्यार्थ्यांना किरकोळ सूचना देऊन, 'बघ तुझं तुलाच गणित सोडवता येत., हा शोध मुलांना लावून देण्याचं अवघड काम 'स्पिक अॅण्ड स्पॅन' च्या शिक्षिकांनी केलं. म्हणूनच स्वयं-अध्ययन साधलं असं निश्चितपणे म्हणता येईल.

ही स्वयं-अध्ययनाची पद्धत राबवतांना मला शिक्षिकांचे लाभलेले सहकार्यच ही पद्धत यशस्वी करु शकली. त्यांनी प्रांजळ मनाने आधीच्या पद्धतीतील सर्व त्रुटी मान्य केल्या व स्वत:च्या जागा त्यानी फार मोठ्या मनाने विद्यार्थ्यांना दिल्या. कारण स्वत:कडे मोठेपणा घेऊन शिकवून टाकणं फार सोपं आहे, पण प्रत्येक विद्यार्थ्यात आत्मविश्वास जागवणं, की तू वाच, पुन्हा पुन्हा वाच. तुझा तुलाच अर्थ समजणार आहे. तु माझ्याकडे किंवा अजून दुसऱ्याकडे मला समजवून द्या असं म्हणत फीरु नकोस. जी समजण्याची शक्ती तुझ्यात आहे, ती जागृत कर. अर्थात पुन्हा पुन्हा वाचुन. अन् त्यावेळी स्वत:ला प्रयत्नपूर्वक, समजावून सांगण्याच्या मोहाला त्यानी दूर सारलं व विद्यार्थ्यांचं हितच साधलं.

मग प्रश्न असा उभा राहतो की, शाळेत मुले स्वयं-अध्ययनाने शिकणार आहेत, तर शाळा शिक्षकांशिवाय चालू शकेल का? छे! उलट या पद्धतीत शिक्षकांची जबाबदारी अजूनच वाढते. कारण, शिक्षकांना जास्त प्रगल्भतेने

प्रत्येक विद्यार्थ्याची समस्या जाणून विद्यार्थीपरत्वे मार्ग सुचवावा लागेल. बागेत झाडे आपलीआप फुलतात. म्हणून माळ्याची काहीच आवश्यकता नाही, असा कोणी निष्कर्ष काढू शकत नाही. तसच शाळेत शिक्षकांचा सहभाग अविभाज्य आहे, त्यांची भूमिका मार्गदर्शकाची आहे याबद्दल दुमत असु शकत नाही.

जसं ध्यान करतांना काहीही न करता आपण नुसतं बसलो असतो, पण ते काहीही न करणंच, खुपच छान करावं लागतं, शिक्षकांना शक्यतो काही शिकवायचं नाही, पण असं करत असतांनाच विद्यार्थ्यांना शक्यतो अडचणी येणारच नाहीत, याकडे अधिक जागरुकतेने लक्ष द्यावे लागते व हे 'स्पिक ॲण्ड स्पॅन' च्या शिक्षिका चांगल्या तऱ्हेने राबवत आहेत.

## स्वयं-अध्ययन पध्दतीमुळे दिसलेले विशेष फायदे-

❖ जी मुले ८वीत व ९वीत हमखास गणित आणि सायन्सची शिकवणी लावीत, त्यांना शिकवणी न लावताच जवळपास पूर्ण गुण मिळु लागले.

❖ काही मुले तर अगदी वर्गातच शिक्षिका असतांना नाचली की इतके मार्क्स आम्हाला कधीच मिळाले नव्हते.

❖ परीक्षांचे भयच मुलांच्या मनातून निघून गेले, ते म्हणतात, केव्हाही घ्या आमची परीक्षा. आम्ही तयार आहोत.

❖ पाठ्यपुस्तक वाचणं अपरिहार्य झाल्यामुळे वाचन-कौशल्य चांगलंच विकसित झालं.

❖ पालक म्हणतात, 'आता मुलं खुप आनंदी असतात' पालकांनी अगदी स्वत: शाळेत येऊन या पद्धतीसाठी धन्यवाद दिलेत.

❖ वाचलेल्या वेळात, मुले आपले इतर छंद, जसे-नृत्य, संगीत, चित्रकला, खेळ इ. जोपासू शकतात.

विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व चौफेर घडवायचं असेल, तर स्वयं-अध्ययनाला पर्याय नाही. कारण, प्रत्येक क्षेत्रात स्वयंअध्यायनाचं तंत्र कसं वापरावं याचं त्यांना ज्ञान होईल आणि मग व्यक्तिमत्त्व विकासाच्या वेगळ्या क्लासची गरजच राहणार नाही व आम्हाला शिकवा हो, समजवा हो असं म्हणत विविध क्लासेसच्या

❖ मागे धावावे लागणार नाही.

तेव्हा 'स्पिक ॲण्ड स्पॅन' च्या कुठल्याही विद्यार्थ्याला यापुढे मार्क्स कमी मिळणार नाहीत व कुणीही त्याला अपमानास्पद वागणूक देणार नाही (ढ म्हणून) ही खात्री त्यांना पटली आहे.

आध्यात्मिक पायावर आधारित, निष्कलंक चाहित्र्य असलेलं पण स्वतंत्र व्यक्तिमत्व विद्यार्थ्याच घडावं अशी 'स्पिक ॲण्ड स्पॅन' ची महत्त्वाकांक्षा आहे.

| | |
|---|---|
| लोकमत | – १ मार्च २००४ |
| लोकसत्ता | – ३० एप्रिल २००४ |
| नवराष्ट्र | – ११ जून २००४ (क्रमशः) |
| | – २० जून २००४ पर्यंत |